# राष्ट्रीय आरोग्य अभियान, अंतर्गत

## आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया, महाराष्ट्र


# वार्षिक अहवाल - २०१९-२०

## थोडक्यात

- २०१९-२० या वर्षभरात लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिये अंतर्गत स्थानिक आणि राज्य पातळीवर झालेल्या उपक्रमांचा/ कामांचा थोडक्यात सारांश राज्य, जिल्हा, तालुका आणि स्थानिक पातळीनुसार सदर अहवालात देण्यात आला आहे.

### संदर्भ-

- स्थानिक संस्था-संघटनांकडून आलेले वार्षिक अहवाल आणि उपक्रमांचे तपशील.
- प्रलंबित किंवा न सुटलेल्या मुद्द्यांचा तपशील
- सकारात्मक घटना (केस स्टोरी)
- जनसंवाद अहवाल
- मासिक व वार्षिक एम.आय.एस.अहवाल
- संस्था-संघटनांसोबत झालेल्या आढावा व नियोजन बैठकांचे इतिवृत्त




## प्रकल्प कालावधी

- एप्रिल २०१९ ते मार्च २०२०

## प्रकल्प कार्यक्षेत्र

- २०१९-२० च्या नियोजन कृती आराखड्यानुसार 'साथी' मार्फत १३ जिल्ह्यातील २८ तालुके, १८९ प्रा.आ. केंद्र आणि ८८६ गावं.

## प्रकल्पातील एकूण संस्था-संघटना

- **उस्मानाबाद :** हॅलो मेडिकल फाऊंडेशन
- **नंदुरबार :** जनार्थ आदिवासी विकास संस्था
- **पुणे :** चैतन्य सामाजिक संस्था, रचना सामाजिक पुनर्बांधणी संस्था, साथी.
- **गडचिरोली :** आम्ही आमच्या आरोग्यासाठी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ युथ वेलफेअर
- **कोल्हापूर :** संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम), सोशल असोसिएशन ऑफ नेटवर्क व्हॉलंटरी ऍण्ड डेव्हलपमेंट (संवाद)
- **सोलापूर :** हॅलो मेडिकल फाऊंडेशन, अस्तित्व
- **बीड :** मानवलोक, समता प्रतिष्ठान.
- **नाशिक :** व्हॉलंटरी असोसिएशन फॉर कम्युनिटी हेल्थ ऍण्ड नर्चर (वचन)
- **औरंगाबाद :** मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, सोसायटी फॉर एज्युकेशन इन व्हॅल्युज अँड ॲक्शन (सेवा)
- **सांगली :** संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम), ग्रामविकास बहुद्देशीय संस्था
- **यवतमाळ :** रसिकाश्रय सांस्कृतिक कला व बहुद्देशीय संस्था, ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट
- **ठाणे :** नवोदय ग्रामीण संस्था
- **पालघर :** आरोहण सामाजिक संस्था

## प्रस्तावना -

आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया जून २००७ पासून महाराष्ट्रातील पहिल्या टप्प्यात ५ जिल्ह्यांपासून सुरू होऊन सध्या १७ जिल्ह्यांमध्ये सुरू आहे. त्यात 'साथी' संस्थेमार्फत १३ जिल्ह्यांमध्ये स्थानिक संस्था संघटनाच्या सहभागाने २०१९-२० या वर्षात २८ तालुके, १९ प्रा.आ. केंद्रे आणि ८८६ गावांसाठी प्रक्रिया राबवली गेली. या प्रक्रियेंतर्गत जिल्हा व तालुका समन्वय संस्थेच्या सहयोगाने आरोग्य सेवांचे बळकटीकरणासाठी राज्य, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर विविध उपक्रम राबविले जातात. २०१९-२० च्या आर्थिक वर्षात राबवलेल्या उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे-

## १. राज्यपातळीवर झालेले उपक्रम व बैठका -

साथी राज्य समन्वय संस्थेकडून वर्षभरात दोन राज्यस्तरीय आढावा व नियोजन बैठका; राज्यस्तरीय अकाऊंटट कार्यशाळा; विविध लोकाधारित आरोग्य कृती कार्यक्रमांबाबत महाराष्ट्रातील प्रक्रियेतील संस्था-संघटनांसोबत क्षमता बांधणी कार्यशाळा; दस्तऐवजीकरण या विषयांवर प्रक्रियेत काम करत असलेल्या कार्यकर्त्यांसोबत राज्यस्तरीय कार्यशाळा इत्यादी उपक्रम घेण्यात आले.

- **राज्यस्तरीय आढावा नियोजन बैठका -** दि. १५ ते १६ जुलै २०१९ आणि दि. १४ ते १५ जानेवारी २०२० घेण्यात आल्या. सदर बैठकांचा मुख्य उद्देश होता की, चालू आर्थिक वर्षामध्ये राज्यस्तरावर झालेल्या उपक्रमांची सर्व संस्था-संघटनांकडून मांडणी करणे व गाव ते जिल्हा पातळीवरील उपक्रमांचा संस्था व जिल्हानिहाय आढावा घेणे, दस्तऐवजीकरण - Audio, Video etc. (Process Documentation) या विषयावर मार्गदर्शन करणे. त्याच बरोबर साथी मार्फत राज्यस्तरावर प्रशासकीय दृष्टीने गरजेच्या मुद्यांची मांडणी करणे. संस्था - संघटनाच्या वतीने पुढील काळात प्रक्रियेअंतर्गत उपक्रम राबवतांना आपले Output Health Indicator's काय असू शकतील? यावर संस्थांसोबत चर्चा झाली. निकष निश्चित केले गेले. मागील वर्षात पुढे आलेली माहिती व पुढील काळात अपेक्षित असलेली माहिती याबद्दल मांडणी करून ठोस उपाय ठरवण्यात आले. तसेच कार्यरत संस्था - संघटनांमार्फत झालेल्या कामाचे रिपोर्ट कार्ड सादर करून पुढील तीन महिन्यांचा कृती आराखडा तयार करण्यात आला. सदर कार्यशाळेस १३ जिल्ह्यातील १९ संस्थांचे संस्था प्रमुख, जिल्हा-तालुका समन्वयक व मानसेवी कार्यकर्ते उपस्थित होते.

- **अकाऊंटट कार्यशाळा -** या अंतर्गत प्रक्रियेत समाविष्ट झालेल्या स्थानिक संस्थेतील अकाऊंटट आणि प्रशासकीय व्यक्तींची क्षमता बांधणी दरवर्षी केली जाते. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता की, **अकाऊंटंटची क्षमता बांधणी व त्या अंतर्गत सर्व जिल्हा व तालुका समन्वयकांसोबत प्रशासकीय व आर्थिक मुद्दांवर एकत्रित चर्चा व नियोजन करणे.** सोबत जुन्या लोकांसाठी काही नव्याने आलेले नियम किंवा मागील वर्षात जमा-खर्चाच्या नोंदींविषयी आलेल्या अडचणी यावर चर्चा व मार्गदर्शन केले गेले. त्याचबरोबर प्रकल्पासाठी येत असलेल्या निधीचा विनियोग, निधी मिळण्यामध्ये होत असलेला विलंब अशा काही मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

- **राज्यस्तरीय 'दस्तऐवजीकरण' (डॉक्युमेंटेशन) कार्यशाळा -** दि. १६ जुलै २०१९ रोजी देखरेख व नियोजन प्रक्रियेतील संस्थांमधील कार्यकर्त्यांचे दस्तऐवजीकरण (Process Documentation) या विषयावर प्रशिक्षण करण्यात आले. यात डॉक्युमेंटेशन म्हणजे काय व त्याचे महत्त्व, केसस्टडीचे घटक समजून घेणे, केसस्टडीचे विषय निवडणे आणि केसस्टडी लेखन करणे या विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच आपल्या नियमित लिखाणात मासिक अहवाल, वार्षिक अहवाल, निवेदने, अधिकारी-कर्मचारी यांच्यासाठी पत्रव्यवहार याबाबतीत देखील सहभागी पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. त्याच बरोबर व्हिडीओ डॉक्युमेंटेशन म्हणजे काय? व्हिडीओचे महत्त्व, फोटोस्टोरी, नेमके फोटोग्राफ्स कसे? कोणते? यावर साथी टीमने प्रत्यक्ष अनुभवातून आलेल्या मुद्यांवर मार्गदर्शन केले.

- **आरोग्यासाठी सामाजिक कृतीचे 'भिन्न पैलू' विषयक राज्यस्तरीय कार्यशाळा -** दि. १३-१४ फेब्रुवारी २०२० रोजी आरोग्य भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली. कार्यशाळेत महाराष्ट्रातील साधारण १००-१२० प्रतिनिधी सहभागी झालेले होते. तसेच इतर काही राज्यातून ज्यांनी सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया यशस्वीपणे राबवली आहे त्यांनीही सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये प्रामुख्याने नरेंद्र गुप्ता- AGCA सदस्य, दिल्ली. अबे जॉर्ज- डायरेक्टर सोशल ऑडिट युनिट, केरळ. उज्वल पहुरकर- सोशल ऑडिट युनिट, झारखंड. करुणा एम, NIRD सल्लागार, तेलंगणा. रक्षिता स्वामी- सोशल

अकौंटीबिलीटी, रेसोर्से युनिट दिल्ली., अभय शुक्ला - SMC, AGCA सदस्य उपस्थित होते. कार्यशाळेचा मुख्य उद्देश हा होता की उपस्थित तज्ज्ञ व अनुभवी व्यक्ती यांच्या चर्चेमधून महाराष्ट्रामध्ये अमलात येऊ शकत असणारे एक मॉडेलचा मसुदा तयार करणे. या दोन दिवसीय कार्यशाळेत सार्वजनिक आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेचा प्रवास, सामाजिक कृती कार्यक्रमाची गरज आणि महत्त्व, सार्वजनिक क्षेत्रात लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया बळकट करण्यासाठीच्या जागा आणि संसाधने या मुद्यांवर/विषयांवर तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींसमोर मांडणी व चर्चा करण्यात आली.

- **राज्य सुकाणू समिती बैठक -** ६ ऑगस्ट २०१९ रोजी, मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र यांच्या अध्यक्षतेखाली मंथन सभागृहात राज्य सुकाणू समिती बैठक घेण्यात आली. बैठकीत सुकाणू समितीच्या माध्यमातून आवश्यक धोरणात्मक मुद्यांवर चर्चा करून घेतलेल्या निर्णयांवर आर्थिक वर्ष २०१९ - २० मध्ये अंमलबजावणी करण्याचे आवाहन संबंधित वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी आणि संस्था-संघटनांना केले गेले. तसेच लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेसंदर्भात अनेक महत्त्वाचे निर्णय देखील घेण्यात आले. त्यापैकी एक मुद्दा म्हणजे देखरेख व नियोजन प्रक्रियेचा या चालू वर्षाचा निश्चित केलेला कालावधी (एप्रिल २०१९ ते ऑक्टोबर २०१९) हा पुढे वाढवणे. सदर बैठकीमध्ये इतर काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली जसे की मागील वर्षी घेण्यात आलेले उपक्रम व मजूर निधीच्या प्रमाणात झालेला खर्च, प्रकल्पाची व्याप्ती वाढवणे इत्यादी.

## २. प्रकाशने व अहवाल

- **लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया संदर्भात मार्गदर्शक सूचना पुस्तिका -** त्यात आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेअंतर्गत फक्त देखरेख नाही तर लोकाधारित नियोजनातून स्थानिक पातळीवर आरोग्य सेवा पोहचावी यासाठी स्थानिक पातळीवरच कशा प्रकारचे काम करता येते आणि सार्वजनिक आरोग्य सेवांचा स्तर उंचावणे, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांचे उत्तरदायित्व वाढवणे अशा स्वरूपाची प्रक्रिया राबवीत असताना आवश्यक सूचना व मार्गदर्शक तत्त्वे या पुस्तिकेमध्ये समाविष्ट करण्यात आले.

- **लेखाजोखा -** महाराष्ट्रातील लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेअंतर्गत एप्रिल २०१९ ते ऑगस्ट २०१९ या कालावधीत झालेल्या कामाचा लेखाजोखा सदर फ्लायरमध्ये देण्यात आला होता. तसेच माता आरोग्य निर्देशांकांचा केलेला तुलनात्मक अभ्यास अहवाल, आरोग्याशी संबंधित निर्देशांकांत झालेली सकारात्मक वाढ, स्थानिक पातळीवरील वेगवेगळ्या समित्यांमार्फत झालेले सकारात्मक बदल, आरोग्य केंद्रांमधील मनुष्यबळ, औषधांची उपलब्धता, आरोग्य ग्रामसभा व त्या पातळीवर घेतले गेलेले निर्णय आणि प्रक्रियेमधून मार्गी लागलेले विविध मुद्दे या विषयी झालेल्या कामाचा लेखाजोखा देण्यात आला होता.

- **लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेची नोंद वही (डायरी) -** लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेमध्ये काम करत असलेले कार्यकर्ते आणि सहभागी असलेल्या संदर्भ घटक / व्यक्तींना सदर डायरीचे वितरण करण्यात आले.

- **पुनःप्रकाशने (Reprinting) -** लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत दरवर्षीप्रमाणे कार्यक्षेत्रात कमी येत असलेले पोस्टर्स, फ्लायर्स, बुकलेट उदा. रुग्ण कल्याण समिती निधी, VHNSC आणि प्रा.आ. केंद्र समितीविषयी मार्गदर्शन पुस्तिका इत्यादी प्रकाशने नवीन छापण्यात आले. त्यानंतर जुलै महिन्यात झालेल्या कार्यशाळेत सदर प्रकाशने सर्व संस्थाना दिले गेले. जेणेकरून चालू आर्थिक वर्षात होणारे उपक्रम, बैठका, स्थानिक जाणीव जागृती कार्यक्रम, कार्यशाळा इत्यादींसाठी त्या प्रकाशनांचा वापर करता येईल

## ३. गाव ते जिल्हा पातळीवर झालेले उपक्रम व बैठका

लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेमध्ये कार्यरत जिल्हा व तालुकास्तरीय संस्थांनी एप्रिल २०१९ ते मार्च २०२० या वर्षात नियोजित तसेच विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. त्यामध्ये प्रामुख्याने गाव ते जिल्हा स्तरावर समित्यांची बांधणी आणि सक्षमीकरण, रुग्ण कल्याण समित्यांचे बळकटीकरण आणि सामाजिक अंकेक्षण, गाव ते जिल्हास्तरावर जनसंवाद, आरोग्य निर्देशांकबाबत माहिती संकलन आणि विविध स्तरावर पाठपुराव्यातून विविध मुद्दे सोडवणे असे उपक्रम समाविष्ट आहेत.

# जिल्हा, तालुका, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि गावं पातळीवर झालेल्या उपक्रमांचा जिल्हानिहाय तपशील

| क्र. | उपक्रम | औरंगाबाद | बीड | गडचिरोली | कोल्हापूर | नाशिक | नंदुरबार | पुणे | सांगली | सोलापूर | यवतमाळ | उस्मानाबाद | पालघर | ठाणे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जिल्हास्तरीय सुकाणू/देखरेख नियोजन समिती बैठक | १ | १ | १ | २ | ० | १ | १ | ० | २ | १ | २ | १ | ० | १३४ |
| २. | जिल्हास्तरीय नियोजन व आढावा बैठक | १० | २ | ४ | ५ | ७ | ७ | ३ | २ | १० | १ | ३ | ० | ० | ५४ |
| ३. | क्षमता बांधणी कार्यशाळा (आशा, अंगणवाडी सेविका, एम.पी.डब्ल्यू, तालुका वैद्यकीय अधिकारी इ.) | १ | ० | १ | ० | १ | ० | १ | १ | ० | १ | २ | ० | ० | ८ |
| ४. | आरोग्यासाठी सामाजिक कृती (CAH) कार्यशाळा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | जिल्हा : माहिती गोळा करणे | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| ६. | जिल्हास्तरीय जनसंवाद | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | सामाजिक अंकेक्षण प्रा.आ.केंद्र | ११ | १९ | १५ | १९ | १६ | ४ | १५ | ४ | ९ | १४ | ८ | ० | ० | १३४ |
| ८. | तालुकास्तरीय दे. नि. समिती बैठका | ५ | २ | ६ | ६ | ० | १ | ५ | ० | ७ | ४ | ५ | ३ | ० | ४४ |
| ९. | ग्रा. रु. माहिती रिपोर्ट कार्ड भरणे | २ | १ | २ | १ | ० | ० | १ | १ | ३ | ० | १ | ० | ० | १२ |
| १०. | तालुकास्तरीय जनसंवाद | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ११. | गावपातळीवरील समित्यांची स्थापना आणि विस्तार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२. | VHSNC समिती सदस्यांचे प्रशिक्षण | ६१ | ८० | ६५ | ८३ | ७० | ५० | २०९ | २७ | ३६ | ७० | ५६ | १७ | ० | ८२४ |
| १३. | गावपातळीवरील जाणीवजागृती कार्यक्रम | ५५ | ९४ | ७७ | १७२ | २७ | ६२ | ९६ | ३६ | ११७ | ७० | ५६ | ७७ | ० | ९३९ |
| १४. | प्रा.आ.केंद्रस्तरीय दे. नि. समिती स्थापना | ५ | २ | १ | ६ | ० | ७ | ६ | १० | ३ | ८ | ३ | १३ | ० | ६४ |
| १५. | प्रा.आ.केंद्रस्तरीय दे.नि. समिती स्थापना | ११ | ० | ७ | १० | ७ | ८ | ४२ | १९ | १० | ६ | ९ | २ | ० | १३१ |
| १६. | प्रा.आ.केंद्रस्तरीय दे.नि. समिती बैठका | ३३ | ३० | ३१ | २७ | १६ | ९ | २९ | ४ | २९ | ४१ | २७ | १० | ० | २८६ |
| १७. | प्रा.आ.केंद्रस्तरीय माहिती गोळा करणे व रिपोर्ट कार्ड भरणे | ५ | १ | २ | ७ | ६ | २ | ० | ६ | १० | ६ | १ | ० | ० | ४६ |
| १८. | प्रा.आ.केंद्रस्तरीय जनसंवाद | ८ | ० | २ | ३ | ० | ० | ० | ० | ५ | ५ | ७ | १ | ० | ३१ |

## २०१८-१९ आर्थिक वर्षामध्ये एकूण १३४ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्ण कल्याण समित्यांचे सामाजिक अंकेक्षण करण्यात आले. या प्रक्रियेमुळे झालेले सकारात्मक बदल...

**१ औरंगाबाद** जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यात देखरेख प्रक्रियेंतर्गत प्रा. आ. केंद्रांमध्ये आधी कार्यकारी मंडळांच्या नियमित बैठका होत नसत. २०१७ -१८ पासून सर्व प्रा. आ. केंद्रांमध्ये रुग्ण कल्याण समिती निधीचे लोक सहभागी अंकेक्षणदरम्यान हा मुद्दा चर्चेला आला. सदर मुद्यांची गंभीरता प्रा.आ. केंद्र समिती ते जिल्हास्तरीय समितीपर्यंत लक्षात आणून दिले. त्यानंतर जिल्हास्तरावर कार्यकारी मंडळांच्या नियमित बैठका होणे अत्यावश्यक असून यापुढे त्या नियमित होतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार या निर्णयावर अंमलबजावणी होऊन सद्यःपरिस्थितीमध्ये सर्व प्रा. आ. केंद्रामध्ये कार्यकारी मंडळांच्या बैठका दर तीन महिन्यांनी होत आहेत.

**२ यवतमाळ** जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यातील पारवा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतींची अवस्था फारशी चांगली नसल्याने दुरुस्तीची मागणी दरवर्षी केली जात असे. याच प्राथमिक आरोग्य केंद्राचे २०१८-१९ मध्ये घेण्यात आलेल्या रुग्ण कल्याण निधीचे लोकसहभागी अंकेक्षण करण्यात आले. त्यामध्ये या आ. केंद्राच्या दुरुस्तीचा पुन्हा एकदा निर्णय होऊन समिती सदस्यांनी सतत पाठपुरावा केला. याशिवाय लोकप्रतिनिधींनी देखील मुद्दा सोडविण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर पाठपुरावा केला. अखेर रु. १५ लाख निधी मंजूर होऊन पारवा प्रा.आ. केंद्राच्या इमारत दुरुस्तीला सुरुवात झाली.

**३ बीड** जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील प्रा. आ. केंद्र बर्दापूर, उजनी व भावठाना येथील इंटरनेट सतत बंद सेवा असायची. ऑक्टोबर २०१९ मध्ये रुग्ण कल्याण समितीचे सामाजिक अंकेक्षण देखरेख व नियोजन समिती सदस्य तसेच रुग्ण कल्याण समिती सदस्यांच्या वतीने करण्यात आले. या प्रा.आ.केंद्राचे इंटरनेट बिल सुमारे १९,२००/- वार्षिक देखभाल निधीतून भारत संचार निगमकडे भरल्याचे समोर आले.

सामाजिक अंकेक्षण करण्याऱ्या टीमने या इंटरनेट कनेक्शनची पाहणी केली असता काही ठिकाणी तिन ते चार महिन्यापासून इंटरनेट सेवा विस्कळीत झाल्याचे दिसून आले. एवढे भरमसाट बिल भरूनही इंटरनेट सेवा मिळत नाही हे लक्षात आले. या टीमने वैद्यकीय अधिकारी यांना कार्यकारी अभियंता भारत संचार निगमकडे लेखी तक्रार देण्यासाठी व प्रतिलिपी तालुका वैद्यकीय अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे देण्याच्या सूचना दिल्या. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी वैद्यकीय अधिकारी यांच्या तक्रारीची छाननी करून सातत्याने भारत संचार निगमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. सध्या प्रा.आ. केंद्र नांदूर व बर्दापूर येथील इंटरनेट सेवेचा प्रश्न सुटला आहे.

**४ गडचिरोली** जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्याअंतर्गत कढोली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीचा मुद्दा मागील २०१८-१९ मधील लोकसहभागी अंकेक्षणामध्ये घेण्यात आला होता. दुरुस्तीचा खर्च मोठा असल्याने जिल्हास्तरावर पाठपुरवठा करणे गरजेचे होते. त्यानुसार जिल्हास्तरावर या मुद्द्याचा पाठपुरावा करण्यात आला. तसेच जिल्हा परिषदेकडून या दुरुस्तीसाठी निधी मंजूर होऊन जानेवारी २०२० मध्ये या दुरुस्तीला सुरुवात होऊन फेब्रुवारी २०२० मध्ये कढोली प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती पूर्ण झाली.



## लोकाधारित देखरेख प्रक्रिये अंतर्गत २०१९-२० मध्ये स्थानिक पातळीवर सुटलेल्या मुद्यांचा तपशील


लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेत १३ जिल्ह्यांमधून गाव ते जिल्हा पातळीवरील वेगवेगळ्या बैठका, कार्यशाळा, संवाद, पाठपुरावा दरम्यान चालू आर्थिक वर्षात आरोग्यसेवा आणि इतर सर्वजनिक सेवांबद्दल देखील सकारात्मक बदल घडत गेले. त्याविषयीची आकडेवारी आणि वि लेषण तक्ता क्र. १ मध्ये नमूद करण्यात आली आहे.

| सेवा / मुद्यांचे स्वरूप | कोणत्या स्तरावर / समितीमध्ये मुद्दे सोडवले गेले व निधीची उपलब्धता | | | |
|---|---|---|---|---|
| | देखरेख प्रक्रियेतील नियमित पाठपुरावा व संवाद | प्रक्रियेतील समित्या आणि जनसंवादामार्फत सोडवलेले मुद्दे | स्थानिक निधी (१४ वित्त आयोग, पेसा, GP, VHNSC) | एकूण सुटलेले मुद्दे |
| आरोग्य यंत्रणेशी आणि सेवांशी संबधित (रिक्त पदे, औषधे, योजना) | २ | १०३ | १२ | ११७ |
| गावातील पाणीपुरवठा, आरोग्य केंद्रातील पिण्याचे पाणी, स्वच्छता इ. | ० | २६ | ६ | ३२ |
| अंगणवाडीतील सेवा, सुविधा | ० | १३ | १४ | २७ |
| स्थानिक समित्यांची बांधणी (VHNSC, RKS) आणि निधी खर्च संबधित | १० | ३ | ० | १३ |
| **एकूण (एप्रिल २०१९ ते जानेवारी २०२० पर्यंत सोडवण्यात आलेले मुद्दे)** | **१२ (६%)** | **१४५ (७७%)** | **३२ (१७%)** | **१८९** |

एकूणच, एप्रिल २०१९ ते जानेवारी २०२० पर्यंत वरील तक्त्यात विभागणी केल्याप्रमाणे १८९ मुद्दे सोडवण्यात आलेले आहेत. त्यापैकी, प्रक्रियेतील समित्या आणि जनसंवादामार्फत सोडवलेले मुद्दे (सर्व विभाग मिळून) सर्वात जास्त म्हणजे ७७ टक्के आहेत. फक्त आरोग्य सेवांबाबत (एकत्रित स्वरूपात असलेले) ११७ प्रकारचे मुद्दे सोडवण्यात आले आहेत.

यासप्रमाणे, वर्षभरात प्रक्रियेतील समित्यांमार्फत काही न सुटलेल्या मुद्यांचा देखील आढावा फेब्रुवारी २०२० मध्ये घेण्यात आला. त्यात असे लक्षात येते की, काही मुद्यांचा नियमित पाठपुरावा करून देखील वर्ष उलटले तरी हे मुद्दे कसे सोडवायचे हा मुख्य 'प्रश्न' पुढे येत आहे. विभागनिहाय सदर मुद्यांचा तपशील समोर दर्शवलेल्या आकृतीप्रमाणे-

**प्रलंबित/न सुटलेले मुद्यांचे वर्गीकरण**
**एप्रिल २०१९ ते जानेवारी २०२०**




## एप्रिल २०१९ ते जानेवारी २०२० या कालावधीत शासकीय आरोग्य सेवा, योजना, निधी संबधीतील न सुटलेल्या मुद्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे,

देखरेख प्रक्रिये अंतर्गत दर वर्षी जाणीव-जागृती, गाव बैठका, समिती बैठका, गृहभेटी, रुग्ण संपर्क, आरोग्य केंद्रांना भेटी, SMS सर्वेक्षण इत्यादी वेगवेगळ्या माध्यमांतून माहिती गोळा केली जाते. त्यात चालू वर्षी स्थानिक पातळीवरील संस्था-संघटनांनी राज्यस्तरावर पाठवलेल्या माहितीनुसार एकूण आरोग्य क्षेत्रात ३१७ मुद्दे (एकत्रित स्वरूपात असलेले) असे आहेत की गाव, प्रा.आ. केंद्र-जिल्हा पातळीवर ठोस निर्णय आणि अंमलबजावणी झालेली नाही. देखरेख प्रक्रियेतील स्थानिक संस्था-संघटना समित्यांमार्फत सदर मुद्यांवर नियमित पाठपुरावा करत आहे.

**न सुटलेले मुद्दे आणि पुढील आर्थिक वर्षात पाठपुराव्यासाठीचे मुद्दे पुढील आकृतीप्रमाणे -**

**शासकीय आरोग्य सेवा व योजना संबंधातील न सुटलेल्या मुद्द्यांचे वर्गीकरण**




### प्रकाशने










**एप्रिल २०१९**
**ते मार्च २०२०**
**या**
**कालावधीमध्ये**
**राज्य,**
**जिल्हा,**
**तालुका व**
**गाव पातळीवर**
**झालेले**
**विविध**
**उपक्रम**








प्रकाशक - साथी **(Support for Advocacy & Training to Health Initiatives)**
(राज्य समन्वयक संस्था, आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया, महाराष्ट्र राज्य)
अमन-ई टेरेस, प्लॉट नं. १४०, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८
फोन : (०२०) २५४७३५६५, २५४७२३२५
**E-mail** : sathicehat@gmail.com, sathicbmp@sathicehat.org
**Website :** www.sathicehat.org, www.cbmpmaharashtra.org
April, 2020

Support for Advocacy & Training to Health Initiatives साथी